UNIVERSITY OF CAMBRIDGE INTERNATIONAL EXAMINATIONS
General Certificate of Education Advanced Level

**MARATHI** **9688/02**

Paper 2 Reading and Writing **October/November 2013**

**1 hour 45 minutes**

Additional Materials: Answer Booklet/Paper

*2038433240*

**READ THESE INSTRUCTIONS FIRST**

If you have been given an Answer Booklet, follow the instructions on the front cover of the Booklet.
Write your Centre number, candidate number and name on all the work you hand in.
Write in dark blue or black pen.
Do not use staples, paper clips, highlighters, glue or correction fluid.

Answer **all** questions.
Write your answers in **Marathi** on the separate Answer Paper provided.
Dictionaries are **not** permitted.
You should keep to any word limits given in the questions.

At the end of the examination, fasten all your work securely together.
The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.

**सर्व प्रथम खालील सूचना वाचा.**

तुम्हाला उत्तरपुस्तिका दिली असल्यास तिच्या मुखपृष्ठावरील सूचनांचे पालन करा.

उत्तरपुस्तिका व पूरक उत्तरपृष्ठांवर तुमचा परीक्षा केंद्र क्रमांक, अनुक्रमांक (रोल नंबर) व तुमचे नाव लिहा.

गडद निळ्या अथवा काळ्या शाईच्या लेखणीने लिहावे.

टाचणी अथवा टाचण्याची कोणतीही अन्य साधने, वाक्यांना अधोरेखित करण्यासाठी रंगीत लेखणीचा वापर ,

डिंक किंवा चूक मजकूर खोडण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या शाईचा वापर करू नये.

**सर्व** प्रश्न सोडवा.

उत्तर लिहिण्यासाठी देण्यात आलेल्या वेगळ्या पृष्ठांवर प्रश्नांची उत्तरे **मराठीत** लिहा.

शब्दकोषांचा उपयोग करण्यास मनाई आहे.

प्रश्नात नमूद केलेल्या शब्दसंख्येच्या मर्यादेत उत्तर लिहावे.

परीक्षेच्या शेवटी उत्तरांची सर्व पृष्ठे व्यवस्थित बांधावीत.

प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी अथवा पोट प्रश्नांच्या शेवटी कंसात [ ] प्रश्नांचे गुण दिले आहेत.

This document consists of **5** printed pages and **3** blank pages.

DC (CW/SW) 70275/2
© UCLES 2013

UNIVERSITY of CAMBRIDGE International Examinations

[Turn over

www.theallpapers.com

## विभाग – 1

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

एखाद्या छोट्या खेड्यातून अथवा गावातून जेव्हा कुणी तरूण शिक्षणासाठी वा नोकरीसाठी पुण्यामुंबईसारख्या एखाद्या मोठ्या शहरात प्रवेश करतो तेव्हा तिथल्या आणि आपल्या गावच्या सांस्कृतिक–सामाजिक पर्यावरणात खूप मोठा फरक असल्याचे त्याला जाणवल्यावाचून राहात नाही. शहरी आणि ग्रामीण वातावरणातला हा फरक, ही दरी फार मोठी असते. ती दरी बुजवायला आणि आपले व्यक्तिमत्त्व तिथे रूजवायला एक लांब पल्ल्याच्या मानसिक संघर्षातून प्रवास करावा लागतो. राहणीमान, बोलीभाषा, वेशभूषा, केशभूषा, शिष्टाचार, उठण्याबसण्यातलं आणि वावरण्यातलं बुजरेपण, इंग्रजीबद्दलची अनामिक भीती इत्यादी छोट्यामोठ्या अनेक गोष्टींतून हा बदलाचा प्रवास होत असतो. खेडेवजा गावात बालपणापासूनची तारूण्यापर्यंतची वर्षे गेलेल्यांना महानगरात आल्यानंतर अशा मानसिक संघर्षातून आवर्जून जावे लागते.

मराठवाड्यातून किंवा विदर्भातून मुंबईपुण्यात आलेल्या माणसाला अगदी किरकोळ गोष्टींपासून बदलांना सामोरे जावे लागते. सदरा खोचण्याच्या पद्धतीपासून ते बेल्ट–बुटाच्या पद्धतीपर्यंत वेशभूषेच्या बाह्य गोष्टींपासून ही बदलाची प्रक्रिया सुरू होते. सुरूवातीला वाटतं हे काहीतरी शहरी वा साहेबी थेर आहेत. पण हळूहळू ते अंगवळणी पडतं आणि त्या पर्यावरणाचा एक भाग असलेली पद्धत अंगवळणी पडत जाते. साधं सदरा खोचणं. गावात आजही 'शर्ट इन' करण्याची पद्धत नाही, तर शहरात अशी माणसं क्वचित सापडतात.

आपले भाषिक उच्चारण हा सुद्धा ग्रामीण–शहरी असे वेगळेपण दर्शविणारा महत्त्वाचा मुद्दा असतो. महाराष्ट्रातल्या वेगवेगळ्या भागात मराठी बोलीच्या उच्चारणाच्या भिन्न भिन्न पद्धती प्रचलित आहेत. बोलण्याच्या शैलीवरून व्यक्तीचा प्रदेश लक्षात येतो. इथे प्रमाण भाषा आणि बोलीभाषा हा संघर्ष उभा राहतो. अनेक लोक आपल्या बोलण्यातला ग्रामीण 'टोन' बदलून शहरी भाषेचा लहजा आत्मसात करतात. परंतु अनेकांना आयुष्यभर तो बदलता येत नाही. काहीजण आपल्या प्रादेशिक अस्मितेचे दर्शन घडविण्यासाठी जाणीवपूर्वक आपल्या भाषेतला ग्रामीण स्पर्श कायम जपतानाही दिसतात. मराठीतले काही लेखक आणि कलावंत असे करताना आपण पाहतो.

समाजजीवनात समरसून जाऊ इच्छिणारी बहुतेक माणसं शहरी जीवनातले भाषिक पर्यावरण आत्मसात करून स्वतःस भूषेप्रमाणेच भाषेचाही नवा झगा पांघरून घेतात. गावातून शहरात आणि शहरातून गावात ये–जा करणाऱ्या माणसांना खूपदा मग तारेवरची कसरत करीत दोन्हीकडच्या लोकांची मने सांभाळीत इकडची भाषा इकडे अन् तिकडची भाषा तिकडे असे प्रयत्नपूर्वक करावे लागते. यातून मग सरमिसळ होऊन अनेक गमतीजमतीही घडतात. गावातून आलेल्या आणि शहरातील मोठ्या कंपन्यांमध्ये व तिथल्या इंग्रजीशरण वातावरणात मात्र अनेकांची गोची झाल्याशिवाय राहत नाही. छोट्या गावातली एकूण शिक्षणव्यवस्था आणि सामाजिक पर्यावरण यात घडलेल्या आणि वाढलेल्या मंडळींना महानगरीय वातावरणाशी जुळवून घ्यायला जाणीवपूर्वक कष्ट व प्रयत्न करावे लागतात. उदाहरणार्थ पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा अजूनही अनेक पारंपरिक रूढींच्या आणि प्रथांच्या जोखडातून मुक्त झालेला दिसत नाही. गावखेड्यात आजही काही प्रमाणात विभेदाचे आणि वैमनस्याचे वातावरण दिसून येते. त्यामुळे आधुनिक विचारांना पुरता वाव आजही मिळत नाही. गावाकडे आढळणारी सामाजिक–सांस्कृतिक पातळीवरची बंधने पुण्यामंबईसारख्या शहरी दैनंदिन वातावरणात फारशी जाणवतच नाहीत. गावात ज्याप्रकारचं काहीसं सनातनी व कर्मठ वातावरण दिसतं तसं शहरात जाणवत नाही. रोजच्या धावपळीत याकडे लक्ष द्यायलाही कुणाला वेळ नसतो.



www.theallpapers.com

**1 उताऱ्यातील पुढील शब्दांचे विरूद्धार्थी शब्द लिहा व त्यांचा स्वतंत्र वाक्यात उपयोग करा.**

**(i)** लांब [1]

**(ii)** तारूण्य [1]

**(iii)** किरकोळ [1]

**(iv)** पारंपरिक [1]

**(v)** वैमनस्य [1]

**2 खाली दिलेले वाक्यप्रयोग अचूकपणे स्पष्ट करणारे शब्द वरील उताऱ्यातून शोधून लिहा. उदाहरणार्थ – समाजातील लोकांचे जीवनमान – समाजजीवन**

**(i)** सुशिक्षित समाजातील लोकांची वर्तनपद्धती [1]

**(ii)** स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव [1]

**(iii)** इंग्रजी भाषेला इतर भाषांच्या तुलनेत श्रेष्ठ समजण्याची वृत्ती [1]

**(iv)** कपडे घालण्याची पद्धत [1]

**(v)** आपल्या अवतीभवतीचे विशिष्ट वातावरण [1]

**3 पुढील प्रश्नांची मराठीत उत्तरे लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहिलेली असावीत. उताऱ्यातील वाक्यांचे अनुकरण उत्तरात नसावे. अन्यथा गुण कमी होतील. प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत. एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** शहरात नव्याने येणाऱ्या व्यक्तींना कपड्यांबाबत काय अनुभव येतो ? [2]

**(ii)** पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील वातावरण कसे आहे ? [2]

**(iii)** खेड्यातून शहरात आलेल्यांना कोणत्या बदलांना सामोरे जावे लागते ? [3]

**(iv)** भाषिक उच्चारणात कोणकोणत्या अडचणी येतात ? [3]

**(v)** सामाजिक–सांस्कृतिक कर्मठतेला शहरी जीवनात कोणते स्थान असते ? [2]

**(vi)** गाव ते शहर अशी सतत ये–जा करणाऱ्यांना काय करावे लागते ? [3]

**एकूण गुण** [20]


www.theallpapers.com

## विभाग – 2

**सर्वप्रथम पुढील गद्य उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यानंतर त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

ग्रामीण आणि शहरी हा भेद कमीअधिक प्रमाणात जगाच्या पाठीवर सर्वत्रच दिसून येतो. त्यात जातीय, धार्मिक, वांशिक, रंगभेद इत्यादी प्रकारच्या विषमतेचीही सरमिसळ झालेली असते. या संदर्भात विकसित आणि विकसनशील असे जगाचे दोन भागही करता येतात. आधुनिकीकरणानंतर विकसित देशांमध्ये ग्रामीण आणि शहरी यातील भेदांचे प्रमाण कमी झालेले दिसते. भाषेच्या, भूषेच्या आणि शिष्टाचाराच्या पातळीवर दिसून येणाऱ्या वेगळेपणाच्या समस्या कमी झालेल्या दिसतात.

ग्रामीण–शहरी यामध्ये जी मुख्य सीमारेषा असते ती म्हणजे शेतीप्रधानता. परंतु ह्या कृषिप्रधानतेचे स्वरूपच गत शंभर वर्षाच्या आधुनिकीकरणात बदलून गेले असल्याने पाश्चिमात्य विकसित जगात ग्रामीण–शहरी ही सीमारेषा बरीच धूसर झाली आहे. विशेषतः भाषेच्या, भूषेच्या आणि शिष्टाचाराच्या बाबतीत संभवू शकणाऱ्या भेदांची जागा सर्वव्यापी आधुनिकतेने घेतलेली दिसते. विशेषतः इंग्लंड आणि अमेरिका यासारख्या देशांमध्ये असे अंतर फारसे आणि चटकन जाणवणारे नाही. अर्थात काही देशी भाषांच्या आणि बोलींच्या अस्तित्वाचा प्रश्न जागतिकीकरणाने व आधुनिकीकरणाने बिकट केला आहे. तो सर्व जगातील भाषांनाच लागू पडणारा आहे. त्यासाठी जगाच्या पातळीवर एक नेटिव्हिझमची चळवळही गेल्या काही वर्षांमध्ये निर्माण झालेली दिसते. हा संघर्ष पुष्कळदा गाव किंवा खेडे आणि शहर किंवा महानगर यांच्यामधला संघर्षही बनताना दिसतो.

काही वांशिक प्रकारचे संघर्षही अधुनमधुन उफाळून येताना दिसतात. त्या निमित्ताने अलीकडच्या काळात काही दंगलींचा अनुभवही जगातील मोठ्या शहरांनी घेतला आहे. याही संघर्षात आर्थिक व सामाजिक मागासलेपणाचे धागे गुंतलेले दिसतात. आधुनिकीकरणाने पुष्कळदा इतिहासात विशिष्ट रीतीने मागास राहिलेले काही समाज दडपले जाण्याची शक्यता असते. आर्थिक विकासाच्या मापदंडामुळे आणि प्रगतीच्या आंधळया गतीमुळे समतोल आणि सर्वस्पर्शी विकासाच्या शक्यता अंधूक होत जातात. जुनी विषमता जाउन एक नवी असमानता जगावर लादली जाते.

त्यातून जसा नैसर्गिक अथवा पर्यावरणीय जैवविविधतेला धोका निर्माण होतो तसाच सांस्कृतिक व सामाजिक विविधतेलाही धोका निर्माण होतो. सांस्कृतिक पातळीवर एक प्रकारच्या सपाटीकरणाचा किंवा सांस्कृतिक एकारलेपणाचा हा धोका असतो. त्यात मग अनेक प्रकारच्या देशी संस्कृती मृतप्राय होऊन सांस्कृतिक विविधता(कल्चरल डायव्हर्सिटी) नष्ट होण्याचा व एकूणच मानवी जीवनव्यवहारात एकारलेपण व कृत्रिमता येण्याचा संभव असतो. एकप्रकारे हा धोका मानवी सहअस्तित्वाच्या आणि सहिष्णुतेच्या मानवतावादी विचारांनाच असतो.

जागतिकीकरणाने आणि आधुनिकीकरणाने जगाच्या पाठीवरील ग्रामीण–शहरी यासारखे भेद जरी विरळ केले असले तरी त्यातून काही नव्या समस्याही निर्माण झाल्या असून त्या आज जगाला ग्रासताना दिसतात. गाव अथवा खेडे हे निसर्गाशी आणि पर्यावरणाशी अधिकाधिक निगडीत असते तर तेवढेच महानगरीय जीवन पर्यावरणाच्या ऱ्हासावर अधिष्ठित असलेले दिसते. निसर्गापासूनचे व वनांपासूनचे दूरत्व म्हणजे शहरीकरण. निसर्गाविरूद्ध निर्माण झालेल्या प्रदूषणाच्या अनेक समस्यांचे आगर म्हणजे शहरीकरण. गाव आणि शहरी संस्कृतींचा आणि तिथल्या जीवनव्यवहाराचा अनुबंध तिथल्या विशिष्ट प्रकारच्या निसर्गाशीही आपल्याला जोडता येतो. शांतीच्या आणि निरामयतेच्या शोधार्थ माणूस शेवटी निसर्गाकडेच जाताना दिसतो. निसर्गाचा नाश करून उभारलेली शहरेही शेवटी त्याच शहरातून बागबगीचे उभे करून तात्पुरते का होइना, पण निसर्गसान्निध्य शोधताना दिसतात. हा विरोधाभास आजच्या मानवी जीवनाचे एक अटळ असे सत्य बनला आहे.


www.theallpapers.com

**4** **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** आधुनिकीकरणाचा ग्रामीण–शहरी भेदावर काय परिणाम झाला ? [2]

**(ii)** पाश्चात्य देशात ग्रामीण–शहरी अंतर का जाणवत नाही ? [3]

**(iii)** आधुनिकीकरणाने कोणत्या समस्या निर्माण होतात ? [4]

**(iv)** ग्रामजीवन निसर्गाशी कशाप्रकारे निगडीत असते ? [3]

**(v)** मानवी जीवनातील निसर्गसान्निध्याचे महत्त्व काय ? [3]

एकूण गुण [20]

**5** **पुढील प्रश्नांची उत्तरे मराठीत लिहा. दोन्ही प्रश्नांच्या उत्तरातील एकूण शब्दसंख्या 140 पर्यंत असावी. उत्तरे स्वतःच्या शब्दात लिहावीत. वरील उताऱ्यातील वाक्ये उत्तरात नसावीत. अन्यथा गुण कमी केले जातील.**
**प्रत्येक प्रश्नाच्या शेवटी गुण दिले आहेत. भाषेच्या गुणवत्तेसाठी अतिरिक्त 5 गुण आहेत.**
**एकूण गुण 15 + 5 = 20**

**(i)** वरील दोन्ही उताऱ्यांच्या आधारे 'ग्रामीण–शहरी भेद आणि आधुनिक जग' या विषयावर एक टिपण लिहा. [10]

**(ii)** ग्रामीण–शहरी भेदाचे तुमच्या देशातील अनुभव विशद करा. [5]

एकूण गुण [20]

© UCLES 2013

www.theallpapers.com

**BLANK PAGE**

© UCLES 2013

www.theallpapers.com

**BLANK PAGE**

© UCLES 2013

www.theallpapers.com

**BLANK PAGE**

Permission to reproduce items where third-party owned material protected by copyright is included has been sought and cleared where possible. Every reasonable effort has been made by the publisher (UCLES) to trace copyright holders, but if any items requiring clearance have unwittingly been included, the publisher will be pleased to make amends at the earliest possible opportunity.

University of Cambridge International Examinations is part of the Cambridge Assessment Group. Cambridge Assessment is the brand name of University of Cambridge Local Examinations Syndicate (UCLES), which is itself a department of the University of Cambridge.



www.theallpapers.com